॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२४—२५/३५०  दिनांक : ११/०२/२०२५

## परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
नांदेड शहरातील रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा प्रभावी प्रचार प्रसार करणे बाबत.**

संदर्भ: डॉ. सुधिर देशमुख, अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, विष्णुपूरी नांदेड यांचे जा.क्र. डॉशंचशावैमनां/मज्योफुजआयो/१२५१/२०२५, दिनांक ०६/०२/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये डॉ. सुधिर देशमुख, अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, विष्णुपूरी नांदेड यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त रूग्णालयांमार्फत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना गरजु रूग्णांकरिता राबविण्यात येते. या योजनांचा अधिकाधिक लाभ गरजू रूग्णांमार्फत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक आहे. याकरिता विविध प्रकारचे जनजागृती अभियान राबविण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचा १०० दिवसांचा कृती आराखडा मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने या जनजागृती अभियानाला अधिक प्रभावी करण्याकरिता युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्याथर्यांना या योजनेबाबत अवगत करून जनजागृती उपक्रमामध्ये सहभागी करून योजनेचे **Ambassador** म्हणून उपयोगी ठरविण्याच्या दृष्टीने नांदेड शहरातील सर्व महाविद्यालयात रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांना माहिती देवून उपकृमामध्ये सहभागी होण्यास कळविले आहे.

तरी नांदेड शहरातील रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, विष्णुपूरी नांदेड यांच्या मार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या जनजागृती उपक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील जास्तित जास्त संख्येने रा.से.यो. स्वंयसेवकांना सहभागी होण्यास कळविण्यात यावे ही, विनंती.

**डॉ.मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

<u>प्रत माहितीस्तव:</u>

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

महाराष्ट्र शासन

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना,

## डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,विष्णुपूरी,नांदेड

फोन नं. 02462 234525 (C.A.O.) अधिष्ठाता 02462 234118 फॅक्स नं. 02462 234702

जा.क्र.डॉशंचशावैमनां/मज्योफुजआयो/ 1251 /२०२५ दिनांक :- 06/०२/२०२५

प्रति,

मा.संचालक तथा कार्यक्रम अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना,
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ,
विष्णुपूरी,
नांदेड.

**विषय :- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा प्रभावी प्रचार व प्रसार करणेबाबत...**
संदर्भ :- क्र.संवैशिवसं/म.ज्यो.फु.जन.आ.यो./शैवि-३/८६८/२०२५ दिनाक ३१/०१/२०२५.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त रुग्णालयांमार्फत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना गरजू रुग्णांकरीता राबविण्यात येते. या योजनांचा अधिकाधिक लाभ गरजू रुग्णांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक आहे. याकरीता विविध प्रकारचे जनजागृती अभियान राबविण्यत बाबत मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचा १०० दिवसांचा कृती आराखडा मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने या जनजागृती अभियानाला अधिक प्रंभावी करण्याकरीता युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाच्या अंतर्गत National Service Scheme च्या विद्यार्थ्यांना या योजनेबाबत अवगत करुन जनजागृती उपक्रमामध्ये सहभागी करुण योजनेचे Ambassador म्हणुण उपयोगी ठरविण्याच्या दृष्टीने नांदेड शहरातील सर्व महाविद्यालयातील National Service Scheme च्या विद्यार्थ्यांना माहिती देऊन उपकृमामध्ये सहभागी होण्याचे आदेश निर्गमीत करुण आम्हास सहकार्य करावे.

करीता आपल्या माहीतीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्थव सविनय सादर.

Smt. Shaikh
Prepare a Circular
13/02/25

आपला विश्वासु,

(डॉ.सुधिर देशमुख)
अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड